## पाहिजेत

ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



## शैक्षणिक

शासकीय कौशल्य विकास बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश

इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, मोटर वाइंडिंग, ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन, टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, कम्प्यूटर ऑपरेटर, कम्प्यूटर पीसी मेंटेनंस, एसी मैकेनिक, प्लंबर, फिटर, वेल्डर पात्रता 10 वी/ 12 वी पास / नापास कॉलेजचे विद्यार्थी, कामगार / कर्मचारी यांनाही प्रवेश ST पास ची, प्लेसमेंट ची, वायरमन लायसन ची सोय

पाटील इलेक्ट्रॉनिक इन्स्टिट्यूट, राधिका रोड, सातारा

मोबाईल 9822097071 वर्ष ४० वे



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २८८ वा | मंगळवार, दि. ३० जून २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# अखेर नराधम भीमराव कांबळेला फाशीची शिक्षा

## नसरापूरच्या चिमुकलीला न्याय

## अवघ्या दोन महिन्यांत ऐतिहासिक निकाल

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करणारा आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे (वय ६५) याला विशेष न्यायाधीश एस.आर. साळुंके यांनी सोमवारी फाशीची शिक्षा सुनावली. कांबळे याला विशेष न्यायालयाने गुरुवारी (२५ जून) दोषी ठरवून निकाल राखून ठेवला होता.

महाराष्ट्रदिनी १ मे रोजी भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करण्यात आला होता. या खटल्यात सरकार आणि बचाव पक्षाकडून अंतिम युक्तिवाद पूर्ण झाला. न्यायालयात सरकार पक्ष, बचाव पक्ष; तसेच बालिकेच्या कुटुंबीयांच्या वतीने बाजू मांडण्यात आली होती. त्यानंतर गुरुवारी (२५ जून) कांबळे याला दोषी ठरवून आरोपपत्रात नमूद करण्यात आलेल्या कलमांना किती शिक्षा आहे, याची माहिती दिली होती. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंके यांच्या न्यायालयात या खटल्याची सुनावणी झाली.

या खटल्यात २० जूनला अंतिम युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर गुरुवारी (२५) सरकार पक्ष, बचाव पक्ष आणि मूळ फियार्दी यांनी आपली बाजू मांडली. या वेळी कांबळेला हजर करण्यात आले होते. तुज्या विरोधात दोषारोपपत्रात नमूद असलेले सर्व आरोप सिद्ध झाले आहेत. तसेच दोषारोपपत्रात नमूद असलेल्या कोणत्या कलमांना किती शिक्षा आहे, याची माहिती न्यायालयाने आरोपीस दिली. 'हा गुन्हा 'दुर्मिळातील दुर्मीळ' आहे. आरोपी कांबळे याला फाशीची शिक्षा देण्यात यावी, आरोपी कांबळे याने केलेले कृत्य घृणास्पद, क्रूर आणि समाजमन हादरवणारे आहे. त्यामुळे आरोपीला कठोर शिक्षा द्यावी. महिला आणि अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे अस्तित्वात आहेत. कायदे अस्तित्वात असताना अशा प्रकारचे गुन्हे घडतात. अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या आरोपींना कायद्याचा धाक बसविण्यासाठी कठोर शिक्षा देण्यात यावी,' अशी विनंती विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी युक्तिवादात केली होती. मिसर यांनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या १२ महत्त्वपूर्ण निकालांचा संदर्भ दिला होता. बचाव पक्षाकडून ॲड. हिंमतराव सूर्यवंशी यांनी बाजू मांडली.





सरकार पक्षाने सादर केलेला डीएनए अहवाल, न्यायवैद्यकीय पुरावे, सीसीटीव्ही चित्रीकरण, परिस्थितीजन्य पुरावे, साक्षीदारांचे जबाब या बाबी विचार घेऊन आरोपीने केलेला गुन्हा सिद्ध होत असल्याचे न्यायालयाने नमूद केले होते. पीडित बालिकेच्या शरीरावर १८ गंभीर जखमा झाल्याचे आढळून आले होते. आरोपीने यापूर्वी दोन महिलांवर अत्याचार केल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते.

**दोन महिन्यांत खटला निकाली**

महाराष्ट्रदिनी भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून खून करण्यात आल्याच्या प्रकरणाचा निकाल हा राज्याच्या न्यायालयीन इतिहासात दोन महिन्यांत सुनावणी होऊन निकाली लागणारा पहिला खटला ठरला. तपासासाठी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक करण्यात आले. या पथकात सहा अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांनी या प्रकरणाचा तपास केला. या खटल्यात सीसीटीव्ही चित्रीकरण, वैद्यकीय पुरावे, न्यायवैद्यक अहवाल, साक्षीदारांची साक्ष अशा विविध बाजूंनी तपास करून पोलिसांनी गुन्हा घडल्यानंतर १५ दिवसांत न्यायालयात १२०० पानी आरोपपत्र दाखल केले. आरोपपत्रासह ५५ पेक्षा जास्त साक्षीदारांचा जबाब, परिस्थितीजन्य पुरावे, तसेच तांत्रिक पुरावे जोडण्यात आले. विशेष न्यायालयात २१ मेपासून या खटल्याची दैनंदिन सुनावणी झाली. हे प्रकरण संवेदनशील असल्याने बंद दाराआड (इन कॅमेरा) सुनावणी झाली.

**सरकार पक्षाचे युक्तिवादातील मुद्दे**

- आरोपीने नियोजन करून थंड डोक्याने खून केला.
- दोन गुन्ह्यांत आरोपी निर्दोष सुटल्याने त्याला कायद्याचा धाक राहिला नाही.
- सुनावणीच्या दरम्यान आरोपीच्या चेहऱ्यावर पश्चातापाचा लवलेश नाही.
- आरोपी लैंगिकदृष्ट्या सक्षम.
- मृत्युदंडाची शिक्षा योग्य.
- समाजात कठोर संदेश जाण्यासाठी कठोर शिक्षेची मागणी.

**कांबळेला या कलमांनुसार शिक्षा**

आरोपी भीमराव कांबळे याच्यावर कलम १३७ (२), ६५ आणि ६५ (बलात्कार), १०३ (खून), ७४ (विनयभंग करण्याच्या उद्देशाने बळजबरी करणे), १४०, (१) यासह लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या (पोक्सो) कलम ४, ६, ८, १२ या कलमांन्वये आरोपपत्र दाखल करण्यात आले. या सर्व कलमांन्वये आरोप सिद्ध झाले आहेत.

# पंढरपूरचा कायापालट होणार!

## विठ्ठल मंदिर परिसरासाठी तब्बल ३,९९३ कोटींचा मेगा प्लॅन

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** श्रीक्षेत्र पंढरपूरचा आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, 'श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखड्या'च्या माध्यमातून पंढरपूरचा कायापालट केला जाणार आहे. हा संपूर्ण विकास आराखडा नगरविकास विभागामार्फत राबविण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच वारकऱ्यांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देतानाच स्थानिकांच्या हिताचे संरक्षण, पुनर्वसन आणि रोजगारनिर्मितीला प्राधान्य दिले जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जिल्हाधिकारी सोलापूर यांनी सादर केलेल्या 'श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखड्या'स राज्यस्तरीय शिखर समितीच्या मान्यतेनंतर १८ जून २०२६ रोजी शासनाने ३,९९३. ९० कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली आहे. हा आराखडा



पंढरपूरच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरणार आहे. या महत्त्वाकांक्षी आराखड्यात वारकऱ्यांसाठी समग्र सोयीसुविधा विकसित करण्यासाठी २८८.६६ कोटी, पुरातन मंदिरे व मठांचे जतन आणि संवर्धनासाठी ३६ कोटी तसेच मंदिर परिसरात भव्य कॉरिडॉर उभारण्यासाठी २५४. ६१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या सर्व कामांवर मिळून पंढरपूर कॉरिडॉरसाठी ५७९.२७ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

याशिवाय नगर प्रदक्षिणा मार्गाचा विकास, चंद्रभागा नदी घाटांचे सुशोभीकरण, आधुनिक वाहनतळ आणि व्यापारी संकुल, शहर सुशोभीकरण, शहराला जोडणारे रस्ते व पूल आणि पालखी तळांचा विकास अशा विविध कामांसाठी एकूण १,३८७. ९१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

आराखड्यात बाधित नागरिकांच्या हितालाही सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. भूसंपादन, पुनर्वसन आणि बाधित इमारतींच्या मोबदल्यासाठी तब्बल २,०२६.७२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, विकासासोबत सामाजिक न्यायाचाही समतोल साधण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या मागणीनुसार भूसंपादनासाठी आवश्यक निधीपैकी त्वरित ३० टक्के निधी वितरित करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सन २०२६-२७ च्या पावसाळी अधिवेशनात या आराखड्यासाठी ६०० कोटी रुपयांची पुरवणी मागणीद्वारे तरतूद करण्यात आली आहे.

दरम्यान, पंढरपूर नगरपरिषद क्षेत्रातील बाधित नागरिकांच्या पुनर्वसनासाठी विशेष पुनर्वसन धोरणास मंजुरी मिळावी यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी नगर विकास विभागाकडे प्रस्तावही सादर केला आहे. त्यामुळे विकासकामे अधिक वेगाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत असलेला हा महत्त्वाकांक्षी विकास आराखडा पंढरपूरला जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र म्हणून विकसित करण्यासोबतच वारकऱ्यांचा प्रवास अधिक सुखकर, सुरक्षित आणि सुविधायुक्त ठरेल; तसेच धार्मिक पर्यटनाला चालना मिळून स्थानिक अर्थव्यवस्था, व्यापार आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊन पंढरपूरच्या सर्वांगीण विकासाला मोठी गती मिळणार आहे.

# यावर्षीच्या आषाढी वारीत ही भाविकांना वेळेत दर्शन मिळण्यासाठी व्हीआयपी दर्शन बंद - पालकमंत्री गोरे

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** आषाढी शुद्ध एकादशी सोहळ्यानिमित्त पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो वारकरी, भाविक येतात. त्यांना मागील वर्षी प्रमाणे यावर्षीच्या आषाढी वारीतही दर्शन कमी वेळेत व सुलभपणे व्हावे यासाठी 10 जुलै 2026 पासून व्हीआयपी दर्शन बंद तसेच मंदिर परिसरात नो वेहिकल झोन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती राज्याचे ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

आषाढी वारी 2026 अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली केबीपी कॉलेजच्या सभागृहात बैठक आयोजित करण्यात आले होती, त्या प्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, राष्ट्रीय महामार्ग चे प्रकल्प संचालक अभिजीत औटी, पोलिस उप विभागीय अधिकारी प्रशांत डगळे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सह आयुक्त नगरपालिका आशिष लोकरे, अन्य धान्य पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, वीज वितरण चे अधीक्षक अभियंता सुनील माने, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे



अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, पंढरपूर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव यांच्या सह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की, मागील वर्षी व्हीआयपी दर्शन बंद केल्याने वारकरी भाविक यांचा श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनाचा वेळ किमान पाच ते सहा तास कमी झाला. तसेच मंदिर परिसरात नो व्हेकल झोन लागू केल्याने भाविकांना मंदिराला प्रदक्षिणा घालणं तसेच दर्शन घेऊन बाहेर पडणे सुलभ झाले होते. तसेच पोलिसांनाही गर्दीवर नियंत्रण ठेवणे शक्य झाले होते. त्यामुळे यावर्षीही 10 जुलैपासून प्रशासनाने या दोन्ही बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

प्रशासनाने यावर्षीच्या वारीतही स्वच्छतेला सर्वोत्तम प्राधान्य द्यावे. नागरी भागात नगरपरिषद तर ग्रामीण भागात जिल्हा परिषदेने वारीच्या अगोदर आठ दिवसापासून स्वच्छता मोहीम सुरू ठेवावी. पंढरपूर शहर, वाखरी पालखी तळ, 65 एकर आणि वाळवंट या ठिकाणी कायमस्वरूपी शौचालये तसेच तात्पुरत्या शौचालयाची स्वच्छता व्यवस्थित करावी. महिला स्नानगृहे, हिरकणी कक्ष निर्माण करून त्यात आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध कराव्यात. तसेच पंढरपूर शहर तसेच उपरोक्त सर्व ठिकाणी कोठेही कचरा पडणार नाही यासाठी पुरेसे साफसफाईचे कर्मचारी नियुक्त करावेत. शौचालयाच्या ठिकाणी चिखल होणार नाही या दृष्टीने मुरमीकरण, कॉंक्रिटीकरण करून घ्यावे. पाणी, वीज पुरवठा सुरळीत ठेवावा, अशा सूचना पालकमंत्री श्री. गोरे यांनी दिल्या.

सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच नगरपरिषद पंढरपूर यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून शहरातील सर्व रस्त्यावरील खड्डयांचे दुरुस्ती करून घ्यावी तसेच नवीन मंजूर करण्यात आलेले रस्ते ही वेळेत पूर्ण करावेत. बांधकाम विभागाने शहरात आणखी रस्ते दुरुस्ती करण्यासाठी निधी आवश्यक असेल तर त्याबाबतची मागणी तात्काळ सादर करावी, पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. पालखीच्या दोन्हीही मार्गावर प्रत्येक मुक्कामे विसावा ठिकाणी शौचालय अगोदर दोन दिवस उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने सोलापूर जिल्हा परिषदेने सातारा व पुणे जिल्हा परिषदेची योग्य समन्वय ठेवावा यात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी, असे निर्देशही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

पालखी मार्गाच्या बाजूंना रस्त्याच्या कडेला विहिरी असतील तर संबंधित विभागांनी तात्काळ त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात किमान सात ते आठ फूट उंचीचे मजबूत बॅरिकेटिंग करून घ्यावेत. चंद्रभागा नदीपात्रातील मोठे खड्डे जेसीबीच्या साह्याने तात्काळ भरून घ्यावेत. जलसंपदा विभागाने चंद्रभागा नदीत आषाढी एकादशीच्या अगोदर पाच सहा दिवस पाणी पोहोचेल या दृष्टीने धरणातून पाणी सोडण्याचे नियोजन करावे, यासाठी जिल्हाधिकारी यांनी स्वतंत्र बैठक घ्यावी. वारकरी, भाविकांसाठी पालखी मार्ग पंढरपूर शहर पालखी तळ या ठिकाणी दिशादर्शक चिन्ह मोठ्या अक्षरात व दिसेल अशा उंच ठिकाणी बसवावेत. आरोग्य विभागाने तिन्ही जिल्ह्यांना औषधांचा मुबलक पुरवठा करावा. पालख्या सोमवेत आरोग्य पथके ठेवावीत. वीज वितरण कंपनीने वारीसाठी पुरुष मनुष्यबळ उपलब्ध ठेवून ते 24 तास कर्तव्यावर राहतील असे नियोजन करावे, अशा सूचना पालकमंत्री श्री गोरे यांनी दिल्या.

मुख्यमंत्री आरोग्य रथ (मेडिकल ऑन व्हील) तसेच मुख्यमंत्री वारकरी सेवा सुविधा केंद्रात वारकरी (पान 2 वर..)

# खोटारड्या भाजप सरकारकडून बळीराजाचा विश्वासघात, शेतकऱ्यांचा 7/12 कोरा केलाच पाहिजे - हर्षवर्धन सपकाळ

**छत्रपती संभाजीनगर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय जनता पक्ष महायुतीचे सरकार अत्यंत खोटारडे आहे. भाजप संसदेत खोटे बोलतो, राम मंदिरात खोटे बोलतो, तसाच शेतकऱ्यांशीही खोटे बोलतो. शेतकऱ्यांचा सात बारा कोरा करण्याची घोषणा



शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पुकारलेल्या ह्यएल्गार अन्नदात्याचाह्ण आंदोलनात कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सहभाग घेतला, यावेळी खासदार सुप्रिया सुळे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे (पान 2 वर..)

# बी. नारायणा फाऊंडेशनतर्फे गरजू विद्यार्थ्यांना मोफत वही व पाट्यांचे वाटप

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** बी. नारायणा फाऊंडेशनतर्फे रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी मोफत वही वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्राथमिक शालेय विद्यार्थ्यांना पाट्यांचेही वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा लाभ जवळपास २०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी घेतला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सुनिल जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विनायक बटगिरी होते. संस्थेचे अध्यक्ष शंकर बटगिरी यांनी प्रास्ताविकातून फाऊंडेशनच्या



शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती देत, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी संस्था सातत्याने कार्यरत राहील, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी श्रीमद् वीरशैव कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेचे विश्वस्त नागेश टंकसाल, संस्थेचे माजी सचिव सत्यनारायण द्यावरकोंडा, नीलकंठेश्वर प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. शामला गवनी, सौ. रेश्मा बोगा, दैनिक कटूसत्यच्या सौ. शिल्पा अलमेलकर, तसेच श्रीनिवास बंदगी, नरसिंग म्हंता, रमेश म्हंताटी, शशिकांत नादरगी, समर्थ बुगडी, नितेश पोगुल, राहुल गड्डम, लक्ष्मीकांत आडकी, राजू माचर्ला, प्रसाद माचर्ला, कार्तिक चिकनी, राजू आवाल, अंबादास दंडगळ, नवल बटगिरी, समर्थ मुटकिरी, रमेश कनकी, नविन गंजी यांच्यासह अनेक मान्यवर व पालक उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मोफत वह्या व प्राथमिक विद्यार्थ्यांना पाट्यांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाबद्दल पालक व विद्यार्थ्यांनी बी. नारायणा फाऊंडेशनचे आभार मानत समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर बटगिरी यांनी केले, तर निखिल बटगिरी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# सोलापूर शहरात वाहतूक पोलिसांची कारवाई!

## चालकांकडील वाहने होणार जप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर वाहतूक पोलिसांकडून दररोज बेशिस्त वाहनांवर कारवाई सुरू आहे. एक हवालदार दररोज किमान ३० वाहनांवर दंडात्मक कारवाई करतो. यावेळी वाहनाची कागदपत्रे नाहीत, लायसन्स देखील नाही, अशांकडील वाहन जप्त केले जात आहे.

याशिवाय नंबरप्लेट नाही, चालक मद्यपान केलेला आहे, वाहतूक नियम मोडून देखील वाहन चालक अंमलदारासोबत अरेरावी, हुज्जत घालत आहे, अशांची देखील वाहने जप्त केली जाणार असल्याचे वाहतूक पोलिस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

सोलापूर शहर वाहतूक पोलिस दरवर्षी दोन लाखांहून अधिक बेशिस्त वाहनांवर दंडात्मक कारवाई करतात. कारवाईसाठी वाहतूक शाखेच्या दक्षिण व उत्तर विभागाकडील प्रत्येकी २५ हवालदारांकडे ई-चालान मशिन देण्यात आली आहे. मशिन कमी असल्याने आणखी ५० मशिन मागविण्यात आल्याचे सहायक पोलिस आयुक्त सुधीर खिरडकर यांनी सांगितले. दरम्यान, वाहतूक पोलिसांनी वाहन अडविल्यास वाहनाचा विमा (इन्शुरन्स), पीयूसी, लायसन्स, आरसी बुक अशी कागदपत्रे असल्यास त्यांना सोडून दिले जाते.

जप्त केलेली वाहने जेलरोड पोलिस ठाण्याच्या आवारात (वाहतूक शाखेच्या मुख्य कार्यालयाजवळ) आणून लावली जात आहेत. वाहतूक पोलिस कारवाई करताना अनेकदा वाहनचालक अरेरावीची भाषा वापरतो. 'हा अधिकारी माझा मामा, काका, भाऊ आहे; तो पदाधिकारी माझ्या ओळखीचा आहे, आम्ही त्याचे कार्यकर्ते आहोत', असे सांगून ते हुज्जत घालतात. त्यांच्याकडील वाहने जप्त करून त्यांचे खटले न्यायालयात पाठविले जातील, असा इशाराही अधिकाऱ्यांनी दिला आहे.

**'ई-चालान'मध्येच फोटो बंधनकारक**

वाहतूक नियम मोडलेल्या वाहनावर 'ई-चालान' मशिनद्वारेच दंडात्मक कारवाई करणे बंधनकारक आहे. वाहतूक अंमलदारांना त्यांच्या स्वतःच्या मोबाईलमध्ये बेशिस्त वाहनांचे फोटो काढून त्यावरून दंडात्मक कारवाई करता येत नाही. विशेष बाब म्हणजे, हवालदार दर्जाच्या अंमलदारालाच त्या मशिनद्वारे बेशिस्त वाहनांवर दंडात्मक कारवाईचा अधिकार आहे.

## संपादकीय

# तेल वाचवताना पाणी गमावणार?

भारत ऊर्जा स्वावलंबनाकडे वाटचाल करत आहे. पेट्रोल आणि डिझेलवरील परकीय अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकारने इथेनॉलला पयार्यी इंधन म्हणून मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वाखाली इथेनॉल मिश्रित इंधनाचा वापर वाढविण्याचे धोरण वेगाने राबविले जात आहे. शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत, साखर उद्योगाला स्थैर्य, परकीय चलनाची बचत आणि कार्बन उत्सर्जनात घट ही या धोरणाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. ही उद्दिष्टे निश्चितच स्वागतार्ह आहेत. मात्र, कोणतेही धोरण राबविताना त्याची पर्यावरणीय, आर्थिक आणि सामाजिक किंमतही तितक्याच गांभीर्याने मोजावी लागते. इथेनॉलच्या बाबतीत ही किंमत थेट पाण्याशी जोडलेली आहे.

आज देशातील अनेक भाग जलसंकटाचा सामना करत आहेत. महाराष्ट्रातील हजारो गावे उन्हाळ्यात टँकरच्या पाण्यावर जगतात. मराठवाड्यात विहिरी कोरड्या पडतात, विदभार्तील शेतकरी आकाशाकडे आशेने पाहत राहतो, तर पश्चिम महाराष्ट्रातही भूजल पातळी सातत्याने घसरत आहे. अशा परिस्थितीत लाखो लिटर पाणी वापरून वाहनांसाठी इंधन तयार करणे ही दीर्घकालीन शाश्वत विकासाची दिशा म्हणता येईल का, हा प्रश्न आता गंभीरपणे विचारण्याची वेळ आली आहे.

भारतातील इथेनॉल उत्पादनाचा मुख्य आधार ऊस आहे. ऊस हे देशातील सर्वाधिक पाणी लागणाऱ्या पिकांपैकी एक आहे. विविध कृषी संशोधनांनुसार एका किलो ऊस उत्पादनासाठी सरासरी १५० ते २५० लिटर पाणी लागते. त्यानंतर त्या उसापासून इथेनॉल तयार करण्याच्या प्रक्रियेतही मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर होतो. आंतरराष्ट्रीय अभ्यासानुसार एका लिटर उसाधारित इथेनॉल तयार करण्यासाठी सुमारे २,००० ते ३,५०० लिटर पाणी खर्च होते. काही प्रदेशांमध्ये हा आकडा ४,००० लिटरपर्यंत पोहोचतो. म्हणजेच अवघ्या तीन लिटर इथेनॉलसाठी जवळपास ६,००० ते १०,००० लिटर पाण्याची गरज भासू शकते.

ही आकडेवारी केवळ पर्यावरणीय प्रश्न निर्माण करत नाही, तर ती आर्थिक वास्तवही स्पष्ट करते. अर्थशास्त्रानुसार कोणत्याही संसाधनाची खरी किंमत त्याच्या दुर्मिळतेवर अवलंबून असते. आज भारतात पाणी हे सर्वाधिक दुर्मिळ आणि मौल्यवान नैसर्गिक संसाधन बनत चालले आहे. त्यामुळे पाण्याची किंमत शून्य मानून तयार होणारे इथेनॉल आज स्वस्त वाटत असले, तरी भविष्यात पाण्याची टंचाई वाढल्यास त्याची सामाजिक आणि आर्थिक किंमत पेट्रोलपेक्षाही अधिक महाग ठरू शकते.

इथेनॉलच्या समर्थनार्थ ब्राझीलचे उदाहरण वारंवार दिले जाते. ब्राझीलने १९७० च्या दशकातील तेलसंकटानंतर 'प्रो-अल्कोहोल' कार्यक्रम सुरू केला आणि फ्लेक्स-फ्युएल वाहनांचा मोठ्या प्रमाणावर प्रसार केला. आज तेथील वाहनचालक पेट्रोल किंवा इथेनॉल यापैकी कोणतेही इंधन वापरू शकतात. मात्र, ब्राझीलच्या यशामागे केवळ तंत्रज्ञान नाही, तर तेथील मुबलक पर्जन्यमान, विस्तीर्ण कृषी क्षेत्र आणि नैसर्गिक जलसंपदा हेही तितकेच महत्त्वाचे घटक आहेत. तेथील बहुतांश ऊस लागवड पावसावर आधारित असल्याने सिंचनासाठी अतिरिक्त भूजलाचा वापर तुलनेने कमी होतो.

भारतातील वास्तव मात्र पूर्णपणे वेगळे आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात आणि उत्तर प्रदेशसारख्या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर ऊस लागवड केली जाते. यापैकी अनेक भाग आधीच जलतणावग्रस्त आहेत. महाराष्ट्रात धरणांतील पाण्याचा मोठा हिस्सा ऊस लागवडीसाठी वापरला जात असल्याची टीका अनेक जलतज्ज्ञांनी केली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी टँकर आणि त्याचवेळी उसासाठी सिंचन अशी विसंगत परिस्थिती कोणत्याही जलव्यवस्थापनाच्या दृष्टीने योग्य म्हणता येणार नाही.

देशातील जलस्थितीची आकडेवारीही अत्यंत चिंताजनक आहे. जगातील सुमारे १८ टक्के लोकसंख्या भारतात राहते; मात्र जगातील गोड्या पाण्याच्या उपलब्ध साठ्यापैकी केवळ ४ टक्के पाणी भारताकडे आहे. १९५१ मध्ये भारतातील दरडोई वार्षिक पाणी उपलब्धता सुमारे ५,२०० घनमीटर होती. आज ती जवळपास १,५०० घनमीटरवर घसरली आहे. आंतरराष्ट्रीय निकषांनुसार १,७०० घनमीटरपेक्षा कमी पाणी उपलब्ध असलेला देश जलतणावग्रस्त समजला जातो. म्हणजे भारत आता जलसंकटाच्या उंबरठ्यावर नसून त्या वास्तवात प्रवेश केला आहे.

याशिवाय देशातील सुमारे ६० टक्के सिंचन आणि ८५ टक्के ग्रामीण पिण्याच्या पाण्याची गरज भूजलावर अवलंबून आहे. हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूपही बदलले आहे. अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, दीर्घ कोरडे कालखंड आणि एल निनोसारख्या हवामान घटकांमुळे दुष्काळाचा धोका वाढत आहे. भूजल पुनर्भरणाचा वेग कमी होत असताना उपसा मात्र सातत्याने वाढत आहे. परिणामी पाण्याचा प्रत्येक थेंब अधिक मौल्यवान ठरत आहे.

इथेनॉलविषयीचा वाद केवळ भारतापुरता मर्यादित नाही. अमेरिका, युरोप आणि ब्राझीलमध्येही 'फूड व्हर्सेस फ्युएल' हा मुद्दा अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. शेतीयोग्य जमीन, अन्नधान्य आणि जलस्रोत यांचा वापर माणसाच्या अन्नसुरक्षेसाठी करायचा की वाहनांच्या इंधनासाठी, हा मूलभूत प्रश्न संपूर्ण जगासमोर उभा आहे. वाढती लोकसंख्या, हवामान बदल आणि घटते नैसर्गिक संसाधने लक्षात घेता या चर्चेचे महत्त्व भविष्यात आणखी वाढणार आहे.

इथेनॉलचे फायदे निश्चितच आहेत. भारत दरवर्षी लाखो कोटी रुपयांचे कच्चे तेल आयात करतो. इथेनॉलमुळे परकीय चलनाची बचत होऊ शकते. शेतकऱ्यांना पयार्यी बाजारपेठ मिळू शकते. साखर उद्योगाला स्थैर्य मिळू शकते आणि हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करण्यास मदत होऊ शकते. मात्र, विकासाचा कोणताही मार्ग निवडताना त्याची शाश्वतता तपासणे आवश्यक असते. नैसर्गिक संसाधनांची हानी करून मिळवलेले आर्थिक फायदे दीर्घकाळ टिकणारे नसतात.

यासाठी ऊसाधारित इथेनॉलवरील अवलंबित्व कमी करून कृषी अवशेषांपासून तयार होणाऱ्या दुसऱ्या पिढीच्या (2G) इथेनॉलला प्राधान्य देण्याची गरज आहे. ऊसाचा चोथा, तांदळाचे पेंढे, मक्याचे अवशेष आणि इतर जैविक कचऱ्यापासून इथेनॉल निर्मिती वाढविल्यास अन्नसुरक्षा आणि जलसुरक्षा यांवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. त्याचबरोबर जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, भूजल पुनर्भरण, पीकपद्धतीतील बदल आणि पाण्याचा कार्यक्षम वापर या बाबींनाही राष्ट्रीय प्राधान्य द्यावे लागेल. ऊर्जा स्वावलंबन आणि जलसुरक्षा यांच्यात संघर्ष नसून संतुलन असले पाहिजे. देशाला पयार्यी इंधनाची गरज आहेच; पण त्यासाठी भविष्यातील पिढ्यांच्या पाण्यावर गदा येणार नाही, याची काळजी घेणे त्याहून अधिक आवश्यक आहे. विकास म्हणजे केवळ आर्थिक वाढ नव्हे, तर नैसर्गिक संसाधनांचे संवर्धनही आहे. एका समस्येवर उपाय शोधताना दुसरी समस्या निर्माण होणार नाही, अशीच धोरणे दीर्घकाळ टिकतात.

आजचा प्रश्न केवळ इथेनॉलचा नाही, तर विकासाच्या दिशेचा आहे. जर पाण्याची खरी किंमत लक्षात न घेता इंधननिर्मितीचा विस्तार होत राहिला, तर भविष्यात भारताला ऊर्जा स्वावलंबन मिळेल; परंतु जलसुरक्षा धोक्यात येईल. आणि इतिहासाने अशी नोंद करू नये की "तेल वाचविण्याच्या प्रयत्नात आपण पाणी गमावले." कारण पेट्रोल आणि डिझेल आयात करता येते, परंतु पाणी आयात करता येत नाही.

# गड-कोटांचा इतिहास आई-बापानी लहानपणीच सांगितला असता तर ही वेळच आली नसती

लोहगड किल्ल्यावर आपल्या भावी नवऱ्याचा कपटाने खून केल्याची अतिशय निंदनीय घटना नुकतीच घडलेली आहे. अतिशय श्रीमंत कुटुंबातील मुलीने उचललेले हे घातक पाऊल समाज संस्कारविहीन होत चालल्याचं लक्षण आहे.

त्या मुलीच्या आई-बापाने शिवरायांनी संपूर्ण जगाला हेवा वाटावा असा इतिहास ज्या गड-कोटांच्या मदतीने घडविला तो इतिहास लहानपणीच बिंबवला असता तर असले भयानक कृत्य त्या मुलीच्या हातून घडलेच नसते. ज्या किल्ल्यांच्या रक्षणासाठी मावळ्यांनी जीव दिला त्याच किल्ल्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या भावी साथीदाराचा जीव घेतला जावा हे वेदनादायी आहे.

स्वराज्याच्या रक्षणामध्ये अतिशय मौल्यवान भूमिका या लोहगड किल्ल्याने बजावली आहे. सुरतेच्या स्वारीत जिंकलेला खजिना काही काळ सुरक्षित ठेवणारा हा लोहगड किल्ला आहे.

आज दुर्दैवाने या महान इतिहासापासून युवा वर्ग विशेषतः अति श्रीमंत कुटुंबातील तरुणाई लांब गेल्यामुळे किल्ल्यावर असे कृत्य होत आहे.

गड कोटावर जायचं तर छत्रपती शिवराय आणि मावळ्यांनी केलेला इतिहास अनुभवण्यासाठी. जिथे शिवरायांनी न्याय-नितीचा कारभार केला ती न्याय-नितीची शिकवण परंपरेने दिली गेली तर अशी दुर्दैवी वेळ नक्कीच येणार नाही.

छत्रपतींच्या जिरेटोपावर जातीचं निशाण फडकविणाऱ्यानी आता तरी सावध होणं गरजेचं आहे. ज्या मुलीने हे कृत्य केले तिला दारुसह अनेक व्यसनं देखील असल्याचे उघडकीस आले आहे. विशीतील तरुण मुले-मुली अशी व्यसनाधीन होत असेल तर त्यांना शिव-शंभूच्या निर्व्यसनी वर्तनाचा इतिहास समजून सांगावाच लागेल.

गड-कोटावर जाऊन प्रि वेडिंग, दारु-अंमली पदार्थांच्या पाट्र्या, नको त्या रिल्स बनवायच्या ऐवजी हिंदवी स्वराज्याच्या महान इतिहासाची उजळणी करण्यासाठी गेलात तर आयुष्य बदलल्याशिवाय राहणार नाही.

याहून दुर्दैवी बाब म्हणजे या घटनेचा निषेध करण्याऐवजी यावर मनोरंजनात्मक रिल्स, मिम्स बनवले जात आहेत. लोहगडासोबतच सर्व गड-कोटांचे महत्व अधोरेखित करणारे व्हिडिओ समाज माध्यमात सक्रिय लोकप्रिय असणाऱ्यांनी बनविले पाहिजेत. जेणेकरून चैनीसाठी गड-कोट नाहीत हे तरी या नाठाळांच्या लक्षात येईल.

प्रत्येक पालकांनी आधी स्वतः किमान जीवनात एकदा तरी रायगडावर शिवरायांच्या समाधीसमोर नतमस्तक होण्यासाठी पायी गड चढावा. ज्या रायगडावर शिवरायांचा राज्याभिषेक झाला तिथे जाऊन राज्याभिषेकापर्यंत हिंदुस्थानासाठी शिवरायांनी मावळ्यांसमवेत केलेला संघर्ष आठवावा. हा सगळा जीवन संघर्ष शिवरायांनी आपल्यासाठी, आपल्या देशासाठी केला होता याची जाणीव आपल्या लेकरांना करून द्यावी. हे किल्ले म्हणजे मजा-मस्तीची ठिकाणे नाहीत तर आपल्या वैभवशाली इतिहासाची जिवंत स्मारके आहेत याची जाण आणि भान सदैव काळजात असलीच पाहिजे.

गड-कोटांचं महत्व आणि त्याचा प्रेरणादायी दैदीप्यमान इतिहास जगायला आपण शिकलो आणि भावी पिढीला तसं जगणं शिकवलं तरच असेल लाजिरवाणे प्रसंग कुण्या आई-बापाच्या आणि राष्ट्राच्या भाळी लिहिले जाणार नाहीत. एवढा जरी बोध यातून आपण घेतला तरी सगळ्यांचं भलं होईल.

या प्रसंगानंतर प्रत्येक मुलींच्या मनात सियाच्या चुकीच्या वागण्याबद्दल संतप्त भावना आहेत. मुलगा पसंद नसेल तर आई-वडिलांशी तसा स्पष्ट संवाद साधला गेला पाहिजे. निदान यापुढे अशा घटनेतून बोध घेत मुलं-मुली लग्नासारख्या विषयात घरी मनमोकळी चर्चा करतील अशी अपेक्षा बाळगूयात...

**- श्रीकांत (बापू) डांगे**
संस्थापक अध्यक्ष
संभाजी आरमार, सोलापूर.

पान १ वरून

## खोटारड्या भाजप सरकारकडून...

प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार निलेश लंके, खासदार कल्याण काळे, खासदार अमर काळे, खासदार बजरंग सोनवणे, राजेश टोपे, अनिल देशमुख, आमदार संदीप क्षीरसागर, मा. आ. सुनील भुसारा यांच्यासह पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यावेळी म्हणाले की, शेतमालाला भाव नाही, महागाई प्रचंड वाढली आहे. शेती करणे परवडणारे नाही, शेती व शेतकरी दोन्ही संकटात आहे पण भाजप सरकार मात्र कुंभकर्णी झोपेत आहे. लाडक्या बहिणींची जशी फसवणूक केली तशीच फसवणूक व विश्वासघात भाजप सरकारने अन्नदात्याचाही केला आहे. सात बारा कोरा करण्याची वल्गना केली होती पण जाहीर केलेली कर्जमाफी मात्र फसवी आहे, लाखो शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही. शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी मागील दोन महिन्यांपासून काँग्रेस व मित्रपक्ष रस्त्यावर उतरून सरकारला जागे करण्याचा प्रयत्न करत आहेत पण सरकार काही जागे होत नाही. सरकारला जाग येईपर्यंत हे आंदोलन थांबणार नाही, असेही सपकाळ म्हणाले..

टीईटी पेपर फुटीवर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, ही काही पहिलीच पेपरफुटी झालेली नाही. भाजप सरकारच्या काळात आत्तापर्यंत 77 वेळा पेपरफुटी झालेली आहे. पेपरफुटी हा धंदा बनला असून व्यापमपेक्षाही हा मोठा घोटाळा आहे. सरकार नावाची यंत्रणा व व्यवस्था कुठेच दिसत नाही. विद्यार्थी व पालकांची क्रूर थट्टा सुरु असून तरुणांच्या भविष्याशी खेळ सुरु आहे. विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मोठे आंदोलन हाती घेतलेले आहे, असेही सपकाळ यांनी सांगितले.

## यावर्षीच्या आषाढी वारीत ही...

भाविकांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी वाखरी ते केबीपी कॉलेज पर्यंत रस्त्याची कामे पूर्ण करावीत व स्वच्छता करून घ्यावी डिव्हायडरच्या मध्यभागी वृक्षारोपण करून घेणे लाइटिंग ची व्यवस्था करावी अशा सूचना श्री गोरे यांनी देऊन सर्व संबंधित विभागांनी मागील वर्षी प्रमाणे यावषीर्ही परस्परात योग्य समन्वय ठेवून सर्वोत्तम काम करावे, असे आवाहन केले. तसेच मागील वर्षीच्या आषाढी वारीत केलेल्या कामाबद्दल सर्व विभागांचे त्यांनी अभिनंदनही केले.

बैठकीस आमदार समाधान आवताडे ऑनलाइनद्वारे उपस्थित होते यावेळी त्यांनी आषाढी यात्रा कालावधीत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक एसटी बसद्वारे येतात. बसस्थानकाच्या ठिकाणची स्वच्छता राहण्यासाठी एसटी महामंडळाने ज्यादा स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी. वारी कालावधीत पंढरपूर शहर व परिसरातील वेळोवेळी स्वच्छता होण्यासाठी ज्यादा स्वच्छता कर्मचारी नेमावेत. तसेच वारी कालावधीत मोबाईल नेटवर्कच्या समस्या उद्भवत असल्याने त्यावर आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात असे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी मागील वर्षी प्रमाणे यावषीर्ही वारीत परस्परात समन्वय ठेवून वारी यशस्वी करू असे सांगितले. तर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पोलीस विभागाच्या वतीने गर्दीवर नियंत्रण ठेवणे तसेच सुरक्षेसाठी उपाययोजना करणे याबाबत नियोजन केल्याचे सांगितले. तर मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी जिल्हा परिषदेच्या वतीने पालखी मार्गावर वारकऱ्यांना सुविधा उभारण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले आहे.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी वारीसाठी केलेल्या कामाची माहिती दिली तर मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर वर्षा डोईफोडे, पुरवठा विभाग, अन्न व औषध प्रशासन, वीज वितरण कंपनीचे अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग, जिल्हा पत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी त्यांनी केलेल्या नियोजनाची माहिती बैठकीत दिली.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026 : तालुकास्तरीय समित्या गठीत

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना थकीत कर्जाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026 जाहीर केली आहे. या योजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे व जलदगतीने करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांच्या आदेशानुसार तालुकास्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी दिली.

तालुकास्तरीय समितीमध्ये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था हे अध्यक्ष म्हणून, तालुका लेखापरीक्षक/उपलेखापरीक्षक व तालुका समन्वयक गटसचिव हे सदस्य म्हणून तर सिनिअर बँक इन्स्पेक्टर, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सोलापूर हे सदस्य सचिव म्हणून कार्यरत राहणार आहेत. या समितीच्या माध्यमातून योजनेची अंमलबजावणी पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने होणार आहे.

समितीचे कामकाजात 31 मार्च 2026 पर्यंतचे सर्व रेकॉर्ड अद्ययावत करणे, Annexure-A मधील माहिती अचूक भरणा करून सादर करणे, पात्र शेतकऱ्यांचे आधार कार्ड, फार्मर आयडी, सेव्हींग खाते क्रमांक व कर्जरोखा तपासणीवेळी उपलब्ध करणे, नियुक्त लेखापरीक्षकांना आवश्यक दप्तर उपलब्ध करून देणे, वैधानिक लेखापरीक्षण अहवाल सादर करणे तसेच कोणताही पात्र शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेणे यांचा समावेश आहे.ही योजना शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देऊन त्यांच्या शेती व्यवसायात स्थैर्य निर्माण करण्यासाठी महत्वाची ठरणार आहे.

# प्रभाग क्रमांक 26 मधील ओम गर्जना चौक ते बॉम्बे पार्क रस्ते कामास सुरुवात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक 26 मधील ओम गर्जना चौक ते बॉम्बे पार्क दरम्यानचा रस्ता ड्रेनेज कामासाठी खोदण्यात आला होता. ड्रेनेजचे काम झाल्यानंतर सदरचा रस्ता आहे त्या स्थितीत करून देणे क्रमप्राप्त असताना देखील सदर ठेकेदार यांनी तो रस्ता व्यवस्थित डांबरीकरण करून दिला नव्हता. त्यामुळे सदर रस्त्यावरून जाणारे-येणारे सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, महिलावर्ग, ज्येष्ठ नागरिक यांना चालणे मुश्किल झाले होते.रस्ता उखडल्यामुळे अनेक अपघात घडले होते तसेच धुळ उडत असल्यामुळे अनेकांना श्वास घेणे जिक्रीचे झाले होते. अनेक नागरिकांना श्वसनाचे आजार जडले होते. त्या भागातील नागरिकांनी सोलापूर महानगरपालिका व नव्याने निवडून गेलेले लोकप्रतिनिधी यांना सदर रस्त्याच्या समस्या बाबत वेळोवेळी तक्रार करूनही कोणीच दखल घेत नव्हते. शेवटी वैतागून सदर भागातील नागरिक यांनी नागरिकाच्या मदतीला धावून जाणाऱ्या माजी नगरसेविका सौ.राजश्री चव्हाण यांना समक्ष भेटून सदर समस्या सांगितल्यानंतर दिनांक 22 मे 26 रोजी सोलापूर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेता नरेंद्र काळे यांना लेखी निवेदन देण्यात आले होते/ याची दखल घेऊन सदर रस्ते कामास सुरुवात करण्यात आली त्यामुळे सदर रस्त्यावरून जाणारे-येणारे सर्वसामान्य नागरिक सुटकेचा निःश्वास सोडला असून सदर रस्त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून सर्व सामान्य जनतेच्या समस्या सोडवल्याबद्दल मनापासून आभार मानले आहेत. व आपले मनोगत व्यक्त केले की नगरसेवक असावा तर माजी नगरसेविका सौ.राजश्री चव्हाण यांच्या सारखा असावा कारण त्यांचा कार्यकाल संपलेला असताना सुद्धा नागरिकांचे कामे मनावर घेऊन करत आहेत असे मनोगत व्यक्त केले.

# डबल तेलाच्या वापरावर एफडीएची करडी नजर; हॉटेलमध्ये शुद्ध पाणी मोफत देणे बंधनकारक

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त) :-** राज्यातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडून वापरल्या जाणाऱ्या तेलाच्या पुनर्वापरावर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) करडी नजर ठेवली असून ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या आस्थापनांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. यासोबतच सर्व हॉटेल व रेस्टॉरंटमध्ये ग्राहकांना शुद्ध पिण्याचे पाणी मोफत उपलब्ध करून देणेही बंधनकारक करण्यात आले आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेत 'सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत राज्यातील सर्व खाद्यव्यावसायिकांसाठी महत्त्वपूर्ण निर्देश जाहीर केले. त्यानुसार प्रत्येक हॉटेल, रेस्टॉरंट आणि खाद्यपदार्थ विक्रेत्याने ग्राहकांना सुरक्षित व पिण्यायोग्य पाणी मोफत उपलब्ध करून द्यावे. तसेच "येथे शुद्ध पिण्याचे पाणी मोफत मिळेल" असा फलक दर्शनी भागात लावणे अनिवार्य करण्यात आले आहे.

याशिवाय स्वयंपाक किंवा तळण्यासाठी एकदा वापरलेले तेल पुन्हा वापरण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. वारंवार वापरलेल्या तेलामुळे कर्करोगासह विविध गंभीर आजारांचा धोका वाढत असल्याने अशा प्रकारावर एफडीएने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, अक्कलकोट तालुका व परिसरात शुद्ध जारच्या पाण्याच्या नावाखाली ग्राहकांची दिशाभूल होत असल्याची चर्चा आहे. पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून जारच्या पाण्याची गुणवत्ता आणि त्यावरील नियंत्रणाबाबतही एफडीएने विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

यापूर्वी गुटखा, मावा आणि दूध भेसळविरोधात विशेष मोहीम राबविणाऱ्या अन्न व औषध प्रशासनाने आता अशुद्ध पाणी, निकृष्ट दजार्चे खाद्यपदार्थ आणि वापरलेल्या तेलाच्या पुनर्वापराविरोधातही व्यापक मोहीम सुरू केली आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही आस्थापनाला पाठीशी घातले जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# बार्शीतील सचिन वायकुळे लिखित 'तिमिर छेदताना' ग्रंथाला साहित्यकृती पुरस्कार



**बार्शी, (कटूसत्य वृत्त):-** राजर्षी शाहू छत्रपती महाराज जयंतीनिमित्त येथील लेखक सचिन वायकुळे लिखित ' तिमिर छेदताना ' या चारित्र ग्रंथाला पुण्यातील राजर्षी शाहू महाराज प्रेरणादायी साहित्यकृती पुरस्कार देऊन पुण्यात सन्मानित करण्यात आले. राजर्षी शाहू मल्टीपर्पज फाउंडेशन, सर्किट बेंच फाउंडेशन व शांतिदूत परिवार महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने देण्यात येणारा हा प्रेरणादायी साहित्यकृती पुरस्कार पुण्यातील पत्रकार भवन येथे पार पडला.

बार्शीचे लेखक वायकुळे यांनी "तिमिर छेदताना" या ग्रंथातून एका अनाथ व्यक्तीच्या यशस्वी जीवन चरित्राचा वेध घेत सामाजिक जाणीव, संघर्ष, जिद्द आणि यशाचा प्रेरणादायी प्रवास प्रभावीपणे मांडला आहे. साहित्याच्या माध्यमातून समाजात सकारात्मक विचार रुजविणारे आणि प्रेरणा देणारे लेखन केल्याबद्दल वायकुळे यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान आला.

यावेळी कार्यक्रमाला उपस्थित राहत राज्यसभेच्या खासदार डॉ.ज्योती वाघमारे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी पद्मश्री उदय देशपांडे, सर्किट बेंच फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.सुरेश राठोड, शांतिदूत परिवाराचे प्रमुख तथा निवृत्त आयपीएस अधिकारी विठ्ठल जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

# लाडकी बहीण योजनेला शुक्लकाष्ठ; शासकीय नोकरीतील महिला आणि पुरुष लाभार्थी रडारवर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत अपात्र लाभार्थ्यांचा शिरकाव झाल्याचे समोर आल्यानंतर आता सरकारने अशा लाभार्थ्यांविरोधात कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. विशेषतः शासकीय सेवेत कार्यरत महिला कर्मचाऱ्यांसह काही पुरुषांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचे उघड झाल्याने संबंधितांकडून अनुदानाची वसुली करण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरू करण्यात आलेल्या या योजनेला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला. लाखो महिलांनी अर्ज सादर केले आणि लाभार्थ्यांची संख्या पुढे कोटींच्या घरात पोहोचली. मात्र अर्जांची पडताळणी आणि ई-केवायसी प्रक्रियेदरम्यान अनेक अपात्र लाभार्थी समोर आले.

शासन निर्णयानुसार शासकीय सेवेत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ घेण्यास पात्रता नव्हती. तरीही अनेक सरकारी कर्मचाऱ्यांनी अर्ज करून अनुदान घेतल्याचे निदर्शनास आले. याशिवाय काही पुरुषांनीही चुकीची माहिती देऊन लाभ घेतल्याची प्रकरणे समोर आली आहेत.

सामान्य प्रशासन विभागाने माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे सुमारे १ लाख ६० हजार शासकीय कर्मचाऱ्यांचा यूआयडी डेटा उपलब्ध करून दिल्यानंतर सेवार्थ प्रणालीतील नोंदींची पडताळणी करण्यात आली. त्यातून किती सरकारी कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला, याचा शोध घेण्यात आला असून अशा लाभार्थ्यांकडून अनुदानाची वसुली करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनीही अपात्र लाभार्थ्यांकडून रकमेची वसुली केली जाईल, असे स्पष्ट केले आहे. यापूर्वी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांनी शासनाची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याची भूमिका जाहीर केली होती.

## वात्रटिका

### लुटेरे

राम सुद्धा अवाक झाला
बघून मारलेला डल्ला...
देवाचेही भय उरले नाही
रिकामा केला सारा गल्ला...
भक्तीभावाने केले दान
दान बघून झाले दानव...
लालसा ओढत नेते अशी
की विसरून जातो मानव...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

## केरळमध्ये जल संसाधन समितीची बैठक
### धैर्यशील मोहिते पाटील उपस्थित



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** केरळ राज्य मुन्नार येथे जल संसाधन विषयक संसदीय स्थायी समितीची बैठक समितीचे अध्यक्ष खा. राजीव प्रताप रूडी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस समितीचे सदस्य म्हणून खासदार धैर्यशील मोहिते पाटील हे देखील उपस्थित होते.

बैठकीत केरळ राज्यातील जलस्रोत व्यवस्थापन, पाणीटंचाई, हवामान बदलाचे परिणाम, भूजल समस्या आणि पूर नियंत्रण हवामान बदलामुळे पर्जन्यमान व तापमानातील होणारे बदल, वाढती लोकसंख्या तसेच पर्यटन क्षेत्रातील वाढत्या पाण्याच्या गरजेमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांवर चर्चा झाली. याच बरोबर येथील इडुक्की धरणाचे व्यवस्थापन, सुरक्षितता, गाळ साचणे आणि पूर नियंत्रण यंत्रणेबाबत आढावा घेण्यात आला. तसेच धरणापासून लगतच्या भागातील कमांड एरिया डेव्हलपमेंट अँड वॉटर मॅनेजमेंट प्रोग्राम अंतर्गत कालवा विकास व जल व्यवस्थापनाच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

जलसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर जल नियोजन आणि भविष्यातील पाणी उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी केंद्र व राज्य स्तरावर समन्वयाने काम करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. जलस्रोतांचे संवर्धन, उपलब्ध पाण्याचा योग्य वापर आणि भविष्यातील जलसुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजनांबाबत सूचना करण्यात आल्या.

## सिव्हिल हॉस्पिटल मधील खड्ड्याबाबत संभाजी ब्रिगेडचे अनोखे आंदोलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय (सिव्हिल हॉस्पिटल) परिसर मध्ये अंतर्गत रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यामुळे रुग्णांना होणाऱ्या त्रासाबाबत व नव्याने सी.सी रस्ते तयार करण्यात यावे या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने रुग्णाला होणारे त्रास शासनाला कळावे व जाग यावी म्हणून लक्ष वेधण्यासाठी अनोखे प्रत्येकात्मक आंदोलन करण्यात आले .

सिव्हिल हॉस्पिटलमध्ये शहर, जिल्हा तसेच राज्यातील विविध भागांतून हजारोच्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येतात. यामध्ये गरीब, होतकरू नागरिक, वीटभट्टी कामगार, बांधकाम कामगार, जेकॉब कामगार, मिल कामगार आदींचा समावेश आहे.

रुग्णांना एक्स-रे, सोनोग्राफी, सी.टी. स्कॅन तसेच इतर वैद्यकीय तपासण्यांसाठी एका विभागातून दुसऱ्या विभागात ने-आण करावी लागते.

मात्र, हॉस्पिटल परिसरातील सर्व रस्ते अत्यंत खराब झाले असून



अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे स्ट्रेचरवरून नेण्यात येणाऱ्या रुग्णांना व प्रसुतीसाठी आलेल्या महिलांना प्रचंड वेदना व त्रास सहन करावा लागत असून अतिशय गंभीर रुग्णांना तातडीने उपचार मिळावे म्हणून रुग्णवाहिकेतून सिव्हिल मध्ये जलद गतीने आणताना सध्या पावसाचे दिवस असल्यामुळे खड्ड्यातील पाण्याचा अंदाज येत नाही त्यामुळे अपघाताचा धोका देखील निर्माण झाला आहे जर यामध्ये रुग्ण दगावल्यास सिविल प्रशासन जबाबदार असेल असा इशारा संभाजी ब्रिगेडने दिलेला आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे मा.पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले धाराशिव जिल्हाध्यक्ष शरद पडवळ जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले माजी शहराध्यक्ष शिरीष जगदाळे उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष विक्रम वानकर उद्योग आघाडीचे शहराध्यक्ष संतोष सुरवसे जिल्हा उपाध्यक्ष फिरोज सय्यद जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश डोंगरे जिल्हा संघटक विशाल जिल्हा संघटक दिलीप भोसले साळुंखे शहर सचिव सतीश वावरे पंकज बहादुले आसिफ हकीम सतीश रंगारेआदी उपस्थित होते.

## नसरापूर प्रकरणातील दोषीवर त्वरित फाशीच्या शिक्षेची अंमलबजावणी करावी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** नसरापूर प्रकरणातील दोषी भिमराव कांबळे याला न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावून पीडितेला न्याय दिल्याबद्दल न्यायालय व महाराष्ट्र शासनाचे आभार व्यक्त करत, या शिक्षेची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी, अशी जोरदार मागणी सोलापूरातील नागरिकांनी केली.

यासाठी शहरातील चौपाड विठ्ठल मंदिर परिसरात मोठ्या संख्येने नागरिक एकत्र आले होते. उपस्थितांनी पीडितेला न्याय मिळाल्याचे समाधान व्यक्त करत, दोषीला कायद्यानुसार लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी केली.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा सोमपा गटनेते अमोल बापू शिंदे यांनी उपस्थितांना संबोधित करत, महिला व बालिकांवरील अत्याचार करणाऱ्यांविरोधात कठोर



कारवाई होणे आवश्यक असल्याचे सांगितले. न्यायालयाने दिलेल्या शिक्षेची त्वरित अंमलबजावणी झाल्यास अशा गुन्ह्यांना आळा बसण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास नगरसेवक सात्विक बडवे, नगरसेवक समाधान आवळे, प्रकाश अवस्थी, राजाभाऊ आलूरे, सागर पिसे, विनोद मोटे, जय मस्के, आयुब पठाण, प्रभाकर गायकवाड, वैभव जवळकोटे, अक्षय बिद्री, अनिताताई गवळी, रुपालीताई वाडेकर, खरात काका, दीनानाथ जाधव, राहुल गोयल, विनय ढेपे, बाळासाहेब पवार, शिवाजी गावडे, प्रवीण खरात, ओंकार शुक्ला यांच्यासह असंख्य माता-भगिनी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी पीडितेला श्रद्धांजली अर्पण करत, महिलांच्या सुरक्षेसाठी कठोर कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आणि न्यायालयाच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली.

## नाझरा येथे चेतनसिंह केदार-सावंत यांच्या हस्ते पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

**सांगोला, (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, नाझरा येथे आज भाजप जिल्हाध्यक्ष तथा सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांच्या हस्ते बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी उपस्थित पालक व नागरिकांना मार्गदर्शन करताना सभापती चेतनसिंह केदार-सावंत म्हणाले, 'दोन थेंब... आयुष्यभराचे संरक्षण!' हा केवळ संदेश नसून प्रत्येक बालकाच्या निरोगी भविष्याची हमी आहे. पोलिओ हा लसीकरणाद्वारे पूर्णपणे टाळता येणारा



आजार असून, ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला प्रत्येक पल्स पोलिओ मोहिमेत दोन थेंब देणे अत्यंत आवश्यक आहे. नियमित लसीकरण झाले असले तरी पल्स पोलिओ मोहिमेतील दोन थेंब आवर्जून पाजावेत. एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, ही प्रत्येक पालक आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी 'निरोगी बालक हेच सक्षम राष्ट्राचे भविष्य आहे. पोलिओमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या परिसरातील प्रत्येक बालकाला लसीकरणासाठी प्रोत्साहित करावे,' असे आवाहन केले.

या कार्यक्रमास सांगोला पंचायत समिती उपसभापती अजय सरगर, सांगोला पंचायत समिती सदस्य डॉ. सदाशिव दबडे, तालुका वैद्यकीय अधीक्षक डॉ. संदीप देवकते, वैद्यकीय अधीक्षक डॉ. ओंकार कोरे, संजय शेळके, भालचंद्र भंडारे, रमेश पाटील, नामदेव आलदर, प्रवीण पाटील, तालुका आरोग्य सहाय्यक अधिकारी डॉ. जिलानी काझी यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी, वैद्यकीय कर्मचारी, आशा सेविका, परिचर, अंगणवाडी सेविका तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाखरीत पालकमंत्री गोरे यांच्या शुभहस्ते पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते जिल्ह्यातील राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ आज आयुष्मान आरोग्य उपकेंद्र, वाखरी (ता. पंढरपूर) येथे उत्साहात करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, सभापती, पंचायत समिती शुभम आगवणे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सरडे, डॉ.



सुडके, प्रा. आ. केंद्र गादेगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आगावणे, सांख्यिकी अधिकारी हेमंत पवार हे उपस्थित होते. तसेच परिसरातील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, वाखरी गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी श्री. कोळी, आरोग्य कर्मचारी, पालक व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते 5 वर्षांखालील बालकाला पोलिओचा डोस पाजून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पालकमंत्री महोदय यांनी जिल्ह्यातील आजच्या पल्स पोलिओ मोहिमेस शुभेच्छा देत 'दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय मिळवू दरवेळी' हा संदेश दिला.

जिल्ह्यातील 4,36,572 बालकांसाठी 6,513 लसीकरण बूथवर 7,222 कर्मचारी कार्यरत आहेत. 0 ते 5 वर्षांखालील एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. कार्यक्रमास उपस्थित पालकांनी आपल्या बालकांना पोलिओचा डोस पाजून मोहिमेत सहभाग नोंदवला.

## एन. बी. नवले सिंहगडला दुहेरी मानांकनाचा बहुमान
## महाविद्यालयाची गुणवत्तेची मोहोर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर यांनी शैक्षणिक गुणवत्तेच्या क्षेत्रात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला असून महाविद्यालयाला राष्ट्रीय आणि विद्यापीठ स्तरावर दुहेरी सन्मान प्राप्त झाला आहे.

देशातील नामांकित शैक्षणिक मूल्यांकन संस्था Careers360 ने महाविद्यालयाला 'AA+' रेटिंग प्रदान केले आहे, तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या Academic and Administrative Audit (AAA) मध्ये महाविद्यालयाने 600 पैकी 550 गुणांसहीत उल्लेखनीय 91.66 टक्के गुणांसह 'A++' ग्रेड प्राप्त करून आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे.

देशातील अभियांत्रिकी शिक्षण संस्थांचे मूल्यमापन करताना विद्यार्थ्यांची गुणवत्ता, प्राध्यापकवर्ग, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, संशोधन कार्य, पायाभूत सुविधा, प्लेसमेंट, नवोपक्रम, विविधता आणि विद्यार्थी विकास या निकषांचा विचार केला जातो. या सर्व बाबींमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे Careers360 ने एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाला भारताच्या सर्वोत्तम अभियांत्रिकी संस्थांपैकी एक म्हणून मान्यता देत अअ+ रेटिंग प्रदान केले आहे.

याचबरोबर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत सोलापूर विद्यापीठाच्या Academic and Administrative Audit समितीने केलेल्या सविस्तर मूल्यमापनात महाविद्यालयाने 91.66 टक्के गुणांसह 'A++' ग्रेड मिळवली. शैक्षणिक नियोजन, प्रशासकीय कार्यक्षमता, विद्यार्थी सुविधा, संशोधन संस्कृती, गुणवत्ता हमी उपक्रम, परीक्षा व्यवस्था आणि संस्थात्मक विकास या सर्व क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत हा सन्मान देण्यात आला आहे.

महाविद्यालयाने गेल्या काही वर्षांत उद्योगाभिमुख शिक्षण, अत्याधुनिक प्रयोगशाळा, संशोधन व नवोपक्रमाला चालना, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमधील प्लेसमेंट, कौशल्य विकास कार्यक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध



उपक्रम राबविले आहेत. त्याचाच परिणाम म्हणून संस्थेला सातत्याने विविध स्तरांवर मानांकन आणि गौरव प्राप्त होत आहेत.

या दुहेरी यशाबद्दल संस्थेचे सहसचिव तथा सोलापूर कॅम्पसचे डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. आर. टी. व्यवहारे, सिंहगड संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सांगितले की, 'राष्ट्रीय स्तरावरील AA+ रेटिंग आणि विद्यापीठाच्या अअअ ऑडिटमधील A++ ग्रेड हे संपूर्ण शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. भविष्यातही गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षण, संशोधन आणि उद्योगाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून संस्थेची प्रगती अधिक उंचावण्याचा आमचा प्रयत्न राहील.'

या दुहेरी मानांकनामुळे एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले असून सोलापूर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी ही अभिमानास्पद बाब मानली जात आहे.

## वैराग पोलीस ठाण्याकडून विद्यामंदिर हायस्कूलमध्ये अंमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम

**वैराग (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासन व पोलीस विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान' अंतर्गत वैराग पोलीस ठाण्याच्या वतीने वैराग येथील विद्यामंदिर हायस्कूलमध्ये जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व उपस्थित नागरिकांना अंमली पदार्थांच्या व्यसनापासून दूर राहण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी उपस्थितांना अंमली पदार्थांचे विविध प्रकार, त्यांचे सेवन केल्याने होणारे शारीरिक, मानसिक, कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक



दुष्परिणाम याबाबत माहिती देण्यात आली. तसेच युवकांमध्ये वाढणारी व्यसनाधीनता रोखण्यासाठी आवश्यक उपाय, तसेच अमली पदार्थांचे सेवन, बाळगणे, वाहतूक, विक्री किंवा त्यास प्रोत्साहन देणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा असल्याची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात एन.डी.पी.एस. कायदा १९८५ मधील तरतुदी व शिक्षेच्या बाबतीतही मार्गदर्शन करण्यात आले. तसेच संशयास्पद हालचाली किंवा अमली पदार्थांच्या विक्रीची माहिती मिळाल्यास तात्काळ पोलीस ठाणे अथवा डायल ११२ वर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त जीवन जगण्याची शपथ घेत समाजात जनजागृती करण्याचा संकल्प केला. 'व्यसनमुक्त युवा - सुरक्षित भारत' हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले.

सदर कार्यक्रमात माननीय पोलीस निरीक्षक श्री. कुंदन गावडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, मु. श्री. इंगळे सर, चेअरमन मृणाल भूमकर सर, आवारे सर, राजमाने सर, उजनकर सर, रेडी सर तसेच गोपनीय अंमलदार किसन कोलते, पोलीस अंमलदार गणेश चव्हाण आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

## सुडोकु - 286

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | 7 | | | 3 | 8 | 2 |
| | 8 | | | | | | 7 | |
| | 3 | | | 8 | | 9 | | |
| | | 4 | | | 8 | 5 | 2 | |
| | | | 2 | 7 | | | | |
| | 7 | 2 | 9 | 4 | | | 6 | |
| 9 | 2 | 6 | 5 | 1 | | | 3 | |
| 1 | | 8 | 3 | 6 | | | 4 | |
| 3 | | | 8 | 2 | 9 | 6 | | 1 |

# माढ्यात प्रशासकीय इमारतीसाठी ५.३२ कोटींचा निधी मंजूर

## कामाला मिळणार गती

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा येथील प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली असून, या प्रकल्पासाठी ५ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे रखडलेल्या या महत्त्वाच्या प्रकल्पाला गती मिळणार असल्याची माहिती माढ्याचे आमदार अभिजित पाटील यांनी दिली.

यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीच्या आराखड्यात तसेच बांधकामाच्या क्षेत्रफळात वाढ करण्यात आली होती. वाढीव बांधकामामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाल्याने सुधारित प्रशासकीय मान्यता आवश्यक होती. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा प्रशासन आणि राज्य शासनाकडे आमदार अभिजित



पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर शासनाने सुधारित प्रशासकीय मान्यता देत ५ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

या इमारतीमुळे महसूल, पंचायत, कृषी, निबंधक तसेच इतर महत्त्वाच्या शासकीय विभागांची कार्यालये एकाच छताखाली कार्यरत होणार आहेत. त्यामुळे नागरिकांना विविध शासकीय कामांसाठी वेगवेगळ्या कार्यालयांत धावपळ करावी लागणार नाही. आधुनिक आणि सुसज्ज प्रशासकीय इमारतीमुळे तालुक्यातील नागरिकांना अधिक सुलभ व दजेर्दार शासकीय सेवा उपलब्ध होणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

या प्रकल्पामुळे माढा तालुक्याच्या प्रशासकीय सुविधांमध्ये मोठी भर पडणार असून नागरिकांच्या वेळेची आणि श्रमांची बचत होणार आहे. तसेच विविध शासकीय विभागांमध्ये समन्वय वाढून प्रशासन अधिक कार्यक्षम होण्यास मदत होईल, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात येत आहे.

# आषाढी यात्रा कालावधीत स्वच्छतेला प्राधान्य द्यावे - पालकमंत्री गोरे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै २०२६ रोजी असून, या यात्रा सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपुरात पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येत असतात. या यात्रा कालावधीत प्रशासनाने वारकरी भाविकांना पायाभूत सुविधा देण्याबरोबरच स्वच्छतेला प्राधान्य द्यावे अशा सूचना ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.

आषाढी वारी 2026 अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वाखरी पालखीतळ, 65 एकर व वाळवंट येथे पाहणी केली, त्या प्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कातीर्केयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी



अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार,पोलिस उप विभागीय अधिकारी प्रशांत डगळे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सह आयुक्त नगरपालिका आशिष लोकरे, अन्न धान्य पुरवठा अधिकारी ओंकार पाडोळे, वीज वितरण चे अधीक्षक अभियंता सुनील माने, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, पंढरपूर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव यांच्यासह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, गतवर्षी आषाढी यात्रा कालावधीत प्रशासनाने वारकरी भाविकांसाठी यात्री पालखीतळ, भक्ती सागर (65 एकर), येथे चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या त्याचप्रमाणे आताही चांगल्या व अधिकच्या सुविधा उपलब्ध कराव्यात. वाखरी पालखी तळावर कायम असणाऱ्या शौचालय परिसरात काँक्रिटीकरण करून घ्यावे. पालखी तळावरील खड्डे बुजवावेत तसेच मुरमीकरण करून सपाटीकरण करावे. प्रकाश व्यवस्था करावी. पालखी तळावर पाणी साठू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात.

कॉलेज चौकातील पुलाचे काम अपूर्ण असून ते तात्काळ पूर्ण करावेत सदरच्या कामाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात राडारोडा पडल्याने अपघात होण्याची शक्यता असून, संबंधित ठेकेदाराने ते काम तात्काळ व वेळेत पूर्ण करावे. अन्यथा संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी. तसेच ते काम करण्यासाठी कार्यक्षम ठेकेदार नेमून तात्काळ पूर्ण करावे. शहरातील रस्ते व डिव्हायडर स्वच्छ करावे. आवश्यक ठिकाणी डिव्हाइडरला रंगकाम करावे. आषाढी यात्रेत भाविकांच्या मोठ्या प्रमाणात निधीची उपलब्धता केली असून, जिल्ह्यात पालखी सोहळे दाखल होण्यापूर्वी सर्व सुविधा उपलब्ध ठेवाव्यात. सरगम चौकातील पुलाखालून वाळवंटापर्यंत रस्ता नगरपालिकेने करावा. 65 एकर येथे स्वच्छता, पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा, वैद्यकीय सुविधा उपलब्धता बरोबर स्वच्छता ठेवावी. चंद्रभागा पत्राच्या काठावरील काटेरी झाडे झुडपे काढावीत तसेच मातीचे ढिगारे काढून सपाटीकरण करावे अशा सूचनाही पालकमंत्री गोरे यांनी दिल्या.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वाखरी पालखीतळ, भक्ती सागर (६५ एकर), चंद्रभागा नदीपात्र येथील पाहणी केली.

# राज्यातील जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांना एक कोटीचे विमा सुरक्षा कवच

## सोलापूर पॅटर्न राज्यात राबविणार - ग्रामविकास मंत्री गोरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेने दहा हजार पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी यांना विमा सुरक्षा कवच प्रदान करून राज्यात विशेष उपद्रव राबविला आहे. राज्यातील ग्रामविकास विभाग अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी १ कोटी रुपए सॅलरी पॅकेज विमा सुरक्षा कवच प्रदान करणेत येणार असल्याची माहिती राज्याचे ग्रामविकास व पंचायराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आज केंद्र प्रमुख पदी निवड झालेल्या केंद्रप्रमुख पदस्थापनेचे आदेशाचे वितरण व जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी सॅलरी सुरक्षा कवच करार व जिल्हा परिषद पदाधिकारी यांना नवीन वाहनाचे चावी प्रदान आज ग्रामविकास मंत्री व पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे हस्ते करणेत आला. या प्रसंगी आमदार देवेंद्र कोठे,जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य हे होते. या सभेस उपाध्यक्ष इंद्रजित पवार, शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार, समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते, कृषी व संवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला बाल कल्याण समितीचे सभापती अमृता वाघे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर,



**जिल्हा परिषद अधिकारी कर्मचारी यांनी १ कोटींचे विमा कवच - ना. जयकुमार गोरे**

सोलापूर जिल्हा परिषदेने सर्वसामान्यांना सेवा देत असताना अधिकारी व कर्मचारी यांना सुरक्षा कवच देऊन राज्यात आदर्श निर्माण केला आहे. सिईओ कुशल जैन व मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे यांचे अभिनंदन केले. हा उपक्रम राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत काम करणारे कर्मचारी यांचे साठी राबविणेत येणार आहे. अपघातात अपंगत्व आल्यास अंपगत्वाच्या टक्केवारीनुसार जास्तीत जास्त ८० लक्ष रुपए, अपत्यांचे विवाह साठी आर्थिक मदत, एका अपत्याचे उच्च शिक्षणासाठी १० लक्ष मदत असे विविध सुरक्षा कवच देणारा हा नाविण्यपुरिण उपक्रम राज्यात राबविणार असल्याचे ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सांगितले.

राज्यात केंद्र प्रमुख यांचे जागा भरा म्हणून आज मला चार निवेदने प्राप्त झाली. परंतू ही प्रक्रिया सोलापूर जिल्हा परिषदेने करून पदस्थापना आदेश वितरीत केले बद्दल शिक्षण सभापती चेतनसिंह केदार व सिईओ कुशल जैन व प्रशासन व शिक्षण विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले. चारचाकी वाहनांचा उपयोग जनतेच्या सेवा अधिक सुलभ होणे साठी करावा. सोलापूर सारख्या ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या जिल्ह्याचे अध्यक्षपद मिळालेले दिपक वैद्य यांचे देखील अभिनंदन करून सर्व पदाधिकारी यांनी विकासास गती देणेचे आवाहन केले.

प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुयंर्कात भुजबळ, जिल्हा आरोग्य अधिकारी सतीश कोपुरवाड, कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, स्टेट बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक आनंदकुमार काटकर, मुख्य व्यवस्थापक अनिकेत शिवडेकर, ट्रेझरी शाखेचे व्यवस्थापक अतुल मगदुम, अतिरिक्त मुख्य लेखा वित्त अधिकारी शशीकिरण उबाळे, लेखाधिकारी मिरगळे प्रमुख उपस्थित होते.

प्रारंभी जिल्हा परिषदेचे प्रागंणात जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार व समितीचे सभापती व पंचायत समितीचे सभापती यांना नवीन वाहनाचे चावी प्रदान पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे हस्ते करणेत आला.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात अधिकारी व कर्मचारी सॅलरी पॅकेज विमा सुरक्षा कवच करार व केंद्र प्रमुख पदस्थापना आदेशाचे वितरण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. प्रारंभी प्रास्तविक मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे व शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी प्रास्तविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे यांनी १० हजार पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी यांना या विमा सुरक्षा कवचाचा लाभ होणार आहे. सोलापूर जिल्हा परिषद राज्यात पहिली जिल्हा परिषद असून हा करार होत असल्याचे सांगितले. १ कोटी रुपए विमा कवच व इतर लाभ मिळणार असल्याचे सांगितले.

# प्रभाग २२,२३ आणि प्रभाग ६ च्या नियमित पाणीपुरवठ्यासाठी किसन जाधव यांची प्रभावी मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२, २३ आणि प्रभाग ६ मधील नागरिकांना स्वच्छ, निर्मळ, उच्च दाबाने व नियमित पाणीपुरवठा व्हावा, तसेच वाढत्या लोकसंख्येचा व प्रभागाच्या विस्ताराचा विचार करून नवीन पिण्याच्या पाण्याच्या टाकीची उभारणी करण्यात यावी, अशी ठाम मागणी नगरसेवक किसन जाधव यांनी शनिवारी झालेल्या प्रभाग २२,२३ आणि ६ च्या झोन क्रमांक ६ च्या अंतर्गत बैठकीत केली. स्थायी समिती सभागृहात झालेल्या या बैठकीस महापौर विनायक कोंडयाल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, प्रभाग २२ च्या नगरसेविका चैत्राली गायकवाड,प्रभाग २३ चे नगरसेवक राजशेखर पाटील, सत्यजित वाघमोडे,



प्रभाग क्रमांक ६ च्या नगरसेविका सोनाली गायकवाड, नगरसेवक ऋषिकेश मेट्रे, सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, महादेव अण्णा गवळी, अर्जुन गायकवाड, पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख व्यंकटेश चौबे, झोन क्रमांक ६ चे विभागीय अधिकारी पानगल,पीएची विभागाचे अधिकारी तसेच संबंधित विभागाचे कर्मचारी आदी उपस्थित होते. यावेळी नगरसेवक किसन जाधव म्हणाले, प्रभाग क्रमांक २२ व २३ मधील नागरिकांना अनेक दिवसांपासून कमी दाबाने व अनियमित पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत आहे. नागरिकांची ही समस्या तातडीने सोडवून त्यांना नियमित, स्वच्छ व उच्च दाबाने पाणी मिळणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. तसेच प्रभागाचा वाढता विस्तार लक्षात घेता नवीन पाणीटाकी उभारणे अत्यावश्यक झाले आहे. यावर पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख व्यंकटेश चौबे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून तांत्रिक बाबींचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात येतील, तसेच नागरिकांना अधिक चांगला व सुरळीत पाणीपुरवठा करण्यासाठी विभाग सकारात्मक असल्याचे सांगितले. महापौर विनायक कोंडयाल यांनीही या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत प्रभाग क्रमांक २२, २३ आणि प्रभाग ६ मधील नागरिकांना स्वच्छ, निर्मळ आणि उच्च दाबाने नियमित पाणीपुरवठा मिळावा यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे. आवश्यक उपाययोजना करून येत्या काही दिवसांत ही कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही नगरसेवक किसन जाधव यांना दिली. सोलापूर शहरातील पाणीपुरवठा योजनेसाठी १३७५ कोटी रुपये मंजूर झाले ह्या अंतर्गत ही बैठक पार पडली.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर-४१३३०४**

**दुरध्वनी क्रमांक ०२१८६ / २२६९७५**

**Web-www.mahapwd.gov.in & Email ID- pandharpur.ee@mahapwd.gov.in**

**अल्प कालावधी ई-निविदा सूचना क्रमांक १२ सन २०२६-२०२७ (ऑनलाईन) प्रशिध्दी**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर-४१३३०४ (दुरध्वनी क्रमांक ०२१८६ / २२६९७५) सर्व योग्य कंत्राटदारांकडून या कार्यालयाचे ०५ कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा दिनांक ३०/०६/२०२६ वेळ सकाळी ११.०० वा. पासून आहे. आषाढी वारी २०२६ च्या पार्श्वभूमीवर दिनांक २०/०७/२०२६ पुर्वी करावयाच्या अतिताडीच्या कामांची निविदा सुचना आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजित किंमत रु. लक्ष | काम पुर्ण करण्याचा कालावधी | ई निविदा संचाची किंमत | कंत्राटदारचा नोंदणी वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आषाढी वारी २०२६ साठी पंढरपूर शहरात ६५ एकर, विविध ठिकाणी व रस्त्यांच्या दुभाजकांमध्ये सुशोभीकरण करणे. | बी-१ | २०८.६७ लक्ष | १ महिना (पावसाळ्यासह) | २,३६०/- (ना-परतावा)ऑनलाईन ई-पेमेंट गेटवे व्दारे | सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी अनिवार्य नाही | सर्व कामे आषाढी वारी २०२६ साठी असल्याने ती दिनांक २०/०७/२०२६ पुर्वी पुर्ण करण्यात यावीत. |
| २ | आषाढी वारी-२०२६ पंढरपूर शहरातील चंद्रभागा घाट ते दर्शन मंडप, व धुंडा महाराज देगलुरकर मठ, परिसरातील मलनिस्सारण व्यवस्था व रस्ते करणे ता. पंढरपूर जि. सोलापूर. | बी-१ | १६९.७० लक्ष | १ महिना (पावसाळ्यासह) | १,१८०/- (ना-परतावा)ऑनलाईन ई-पेमेंट गेटवे व्दारे | सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी अनिवार्य नाही | |
| ३ | आषाढी वारी २०२६ पंढरपूर शहरातील अंमळनेरकर महाराज मठ परिसर व शहरातील आवश्यक भागात मलनिस्सारण व्यवस्था व रस्ते करणे ता. पंढरपूर जि. सोलापूर. | बी-१ | १६७.९० लक्ष | १ महिना (पावसाळ्यासह) | १,१८०/- (ना-परतावा)ऑनलाईन ई-पेमेंट गेटवे व्दारे | सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी अनिवार्य नाही | |
| ४ | आषाढी वारी- २०२६ साठी शहरातील ८ विविध पार्किंग ठिकाणी, पत्राशेड, वाखरी पालखीतळ, ६५ एकर भक्तीसागर व शहरातील यात्रेकरू व विविध पालख्या मुक्कामी असणा-या ठिकाणी मुरमीकरण करणे. | बी-१ | १६८.८१ लक्ष | १ महिना (पावसाळ्यासह) | १,१८०/- (ना-परतावा)ऑनलाईन ई-पेमेंट गेटवे व्दारे | सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी अनिवार्य नाही | |
| ५ | आषाढी वारी - २०२६ साठी नदीपात्र (वाळवंट) येथे तसेच शहरातील इतर आवश्यक ठिकाणी दिशादर्शक फलक लावणे. | बी-१ | ६२.९८ लक्ष | १ महिना (पावसाळ्यासह) | १,१८०/- (ना-परतावा)ऑनलाईन ई-पेमेंट गेटवे व्दारे | वर्ग ४ अ व त्यावरील | |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी | दिनांक ३०/०६/२०२६ वेळ सकाळी ११.०० वा. ते दिनांक ०२/०७/२०२६ वेळ सायं. १७.३० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईन निविदामध्ये तांत्रिक मुद्दे उपस्थित करावयाचा अंतिम दिनांक व वेळ (निविदा पुर्व चर्चा बैठक) | ---निरंक--- |
| ३ | बिड सबमिशन कालावधी | दिनांक ३०/०६/२०२६ वेळ सकाळी ११.०० वा. ते दिनांक ०२/०७/२०२६ वेळ सायं. १७.३० वाजेपर्यंत |
| ४ | तांत्रिक आणि आर्थिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | मा. अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, सोलापूर या कार्यालयात दिनांक ०३/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

टिप:-

१. वरील सर्व कामे आषाढी वारी २०२६ साठी असल्याने ती दिनांक २०/०७/२०२६ पुर्वी पुर्ण करण्यात यावीत.

२. वरील कामांची सर्व माहिती ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.gov.in and www.mahatenders.gov.in या इंटरनेटवरील वेबसाईटवर दिनांक ३०/०६/२०२६ पासून उपलब्ध आहे. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.

३. सर्व पात्र / इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या www.mahatenders.gov.in वर enrolled करणे आवश्यक आहे.

४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई - निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**सही/- (अ.ता. निमकर)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर**

(डीजीआयपीआर-२०२६-२७/क्र-५/सी१३५५)


# शिक्षण सेवेतून निवृत्ती ही शिक्षकांच्या जीवनातील नवीन पर्वाची सुरुवात- आ. सचिन कल्याणशेट्टी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** शिक्षकांची शिक्षण क्षेत्रातून निवृत्ती ही त्यांच्या जीवनातील नवीन पवार्चा प्रारंभ असतो. त्यांचे ज्ञान, अनुभव आणि विद्यार्थ्यांवरील प्रेम कधीही निवृत्त होत नाही. म्हणून शिक्षकांनी सेवानिवृत्ती नंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची भूमिका घेतली पाहिजे, समाजाला आपल्या अनुभवाचा लाभ देऊन सन्मान मिळवला पाहिजे असे प्रतिपादन आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेतील सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालय अक्कलकोट व अनंत चैतन्य विद्यालय हन्नूर येथील मुख्याध्यापक अशोक साखरे, सरदार मतेखाने पर्यवेक्षक सुरेश रूगे, श्रीमती श्रीदेवी मायनाळे, सेवक विश्वनाथ सैदे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभ पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण



संकुलामध्ये आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, उपाध्यक्ष भीमराव साठे,माजी मुख्याध्यापक सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका तथा जि प सदस्या शांभवी कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, जूनियर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, किणी प्रशालेचे माजी मुख्याध्यापक अशोक रामशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, शिक्षकांच्या निःस्वार्थ सेवेमुळे संस्थेची शैक्षणिक प्रगती होते. संस्थेच्या वाटचालीत सुरुवातीला आलेल्या शिक्षकांचा मोलाचा वाटा असतो. त्यांनी आपल्या कर्तव्यनिष्ठेने आणि समर्पणाने घालून दिलेला आदर्श पुढील पिढीतील शिक्षकांसाठी प्रेरणादायी असते, म्हणून सेवानिवृत्त शिक्षकांनी नवीन पवार्ची सुरुवात करत असताना समाजाचे व विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक झाले पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले, सूत्रसंचलन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार मनीषा दूधभाते यांनी मानले.

या कार्यक्रमास हन्नूर प्रशालेचे मुख्याध्यापक ज्ञानदेव शिंदे, माजी मुख्याध्यापक विलास बिराजदार, गुरूनाथ गवंडी, पर्यवेक्षक सिद्रामप्पा पाटील, भैय्या मुल्ला उपस्थित होते.

**स्पर्धा परीक्षेसाठी मोफत मार्गदर्शन करावे**

सेवानिवृत्तीनंतर शिक्षक हा शिक्षण क्षेत्राशी जोडलेला असतो, म्हणून सेवानिवृत्त शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी मोफत मार्गदर्शन केले पाहिजे. वाचन संस्कृती, सामाजिक उपक्रम, व्याख्याने व शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे असे प्रतिपादन शांभवी कल्याणशेट्टी यांनी केले.

# पत्रकारांच्या वतीने खा.संजय दिना पाटील यांचा जाहीर निषेध

**अकलूज (विलास गायकवाड):-** मुंबई येथील खासदार संजय दिना पाटील यांना, मुंबईतील काही पत्रकार बांधव यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे न देता,त्यांना असभ्य अश्लील भाष्य करत,मारण्याची धमकी दिली. यामुळे माळशिरस तालुक्यातील पत्रकार बांधवांनी, खासदार संजय दिना पाटील यांचा जाहीर निषेध करत, उपविभागीय पोलिस अधिकारी माळशिरस विभाग अकलूज, यांचेकडे खासदार संजय दिना पाटील यांच्या वरती कारवाई होणे बाबतचे निवेदन सादर केले.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार राजू लोहकरे, लक्ष्मीकांत कुरुडकर, नागेश




लोंढे, सुखदेव साठे, संजय बडे, कृष्णा लावंड, संदीप लोणकर, संतोष भोसले, शिवाजी पालवे,गणेश जाधव, विलास गायकवाड, मंगेश सोनार, अमित गदादे, शशिकांत कडबाने, सागर खरात, सोमनाथ खंडागळे, शांतीलाल रेडे इत्यादी उपस्थित होते.

पत्रकार हे समाजाच्या व्यथा, त्यांच्या अडचणी, शासन दरबारी निस्वार्थी भावनेने पोचवत असतात. बेकायदेशीर, अवैध्य धंदे असो किंवा एखाद्यावर होत असलेला अन्याय असो, या विरुद्ध जीवाची बाजी लावून वाचा फोडण्याचे काम पत्रकार करतात. सूयार्ची प्रखर दाहकता असो किंवा तुफानी वारा वादळ असो किंवा पर्जन्यवृष्टी असो, स्वतःच्या जीवाची पर्वा न करता पत्रकार बातमीला अधिक महत्व देतात.तर सामाजिक, राजकीय, सहकार, कला, क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रांच्या बातम्या जनतेपर्यंत पोचवण्याचे काम पत्रकार करतात.यामुळेच पत्रकारांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखले जाते.असे असताना खासदार संजय दिना पाटील सारखा लोकप्रतिनिधी, पत्रकारांचा अवमान करतात.त्यांना मारण्याची भाषा वापरून स्वतःच्या बुद्धीची क्षमता दाखवत, प्रदर्शन मांडतात. अशा लोकप्रतिनिधीला पुढे जाऊन जनताच धडा शिकवल अशा प्रतिक्रिया जनतेतून व्यक्त होताना दिसत आहेत.